# डेबिट कार्ड्ससाठी अटी आणि शर्ती

या अटी आणि नियम आरबीएल बँकेने प्रस्तुत केलेल्या डेबिट कार्ड्स जारी करण्यासाठी आणि वापरासाठी लागू होतात आणि त्यांचे नियमन करतात, तसेच ते खातेधारकासाठी आणि/किंवा त्या खातेधारकाद्वारा विनिर्दिष्ट कोणत्याही व्यक्तीसाठी भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या नियम आणि नियमनांसाठी देखील लागू होतात.

या अटी आणि शर्ती ("अटी") आरबीएल बँकेने विहित केलेल्या कोणत्याही इतर अटींच्या व्यतिरिक्त असतील. अटींसाठी असलेले सर्व जोडपत्र या अटींचा एक अविभाज्य भाग बनतील.

**व्याख्या:**

या अटी आणि शर्तींमध्ये, विषय किंवा संदर्भासाठी काहीही विपरीत असल्याखेरीज, खालील शब्द/अभिव्यक्तींचा खाली नमूद केल्याप्रमाणे अर्थ असेल:

"खाते" याचा अर्थ या कार्डच्या वापराद्वारे चालवण्यासाठी पात्र खाते/खाती असण्यासाठी आरबीएल बँकेने नियुक्त केलेले बचत आणि/किंवा चालू खाते असा असेल.

"खात्याचे विवरण पत्र" याचा अर्थ आरबीएल बँकेने कार्डधारकाला वेळोवेळी पाठविलेले खात्याचे नियतकालिक विवरण पत्र असते, ज्यात त्या तारखेनुसार त्या खात्यात केलेले व्यवहार आणि खात्यातील शिल्लक, आणि आरबीएल बँकेला योग्य वाटेल अशी कोणतीही इतर माहिती समाविष्ट असते.

"खातेधारक" याचा अर्थ व्यक्ती, मालकी, टीएएससीची (विश्वस्त, असोसिएशन, सोसायटी, क्लब्ज) भागीदारी संस्था, पब्लिक लिमिटेड कंपन्या किंवा आरबीएल बँकेत खाते असलेली एलएलपी संस्था किंवा कंपनी असा आहे. तथापि, बचत खात्याच्या संदर्भात, "खातेधारक" ही अभिव्यक्ती बँकेत असे खाते असलेल्या केवळ व्यक्तींना संदर्भित करते.

"संलग्न" म्हणजे आणि त्यात समाविष्ट आहेत: आरबीएल बँकेची होल्डिंग किंवा आनुषंगिक असलेली कोणतीही कंपनी आहे, किंवा आरबीएल बँकेच्या नियंत्रणाखाली असलेली किंवा सामाईक नियंत्रणाखाली असलेली व्यक्ती किंवा आरबीएल बँकेचे थेट किंवा फायदेशीर हित किंवा व्होटिंग सेक्युरिटीजचे 26% पेक्षा जास्त नियंत्रण असलेली कोणतीही व्यक्ती असा होतो. या कलमाच्या हेतूसाठी, कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात जेव्हा व्याकरणाच्या बदलांसह "नियंत्रण" हा शब्द वापरला

जातो, ज्याचा अर्थ अशा व्यक्तीचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, सिक्युरिटीज वाहून नेणाऱ्या मताच्या मालकीद्वारे, करारादवारे किंवा अन्यथा, व्यवस्थापन आणि धोरणांना संचालित करण्याचे अधिकार असा होतो; आणि "व्यक्ती" याचा अर्थ कंपनी, कॉर्पोरेशन, भागीदारी, विश्वस्त किंवा इतर कोणतेही अस्तित्व किंवा संस्था किंवा अन्य कोणतीही संस्था असा होतो. "एटीएम" याचा अर्थ कोणतीही ऑटोमेटेड टेलर मशीन असेल, मग ती भारतातील असेल किंवा परदेशातील, मग ती आरबीएल बँकेची असेल किंवा विनिर्दिष्ट शेअर्ड नेटवर्कची असेल, जेथे, इतर गोष्टींबरोबरच, कार्डधारक RBL बँकेकडे असलेल्या त्याच्या खात्यातील त्याचा पैसा मिळवण्यासाठी त्याचे कार्ड वापरू शकतो.

"कार्ड" याचा अर्थ भारतातील खातेदाराला जारी केलेले आरबीएल बँकेचे डेबिट कार्ड आणि/किंवा खातेदाराने RBL बँकेला निर्दिष्ट केलेल्या अन्य कोणतीही व्यक्ती असा होतो.

"कार्डधारक" किंवा "ग्राहक" याचा अर्थ आरबीएल बँकेचा खातेधारक किंवा खातेधारकाने अधिकृत केलेली अशी कोणतीही व्यक्ती, ज्याला कार्ड जारी केले गेले आहे आणि जो कार्ड ठेवण्यासाठी/वापरण्यासाठी अधिकृत आहे असा होतो.

"देशांतर्गत व्यवहार" याचा अर्थ कार्डधारकाने भारतातील त्याच्या देशांतर्गत वैध अशा डेबिट कार्डद्वारे केलेले व्यवहार असा होतो.

"डू नॉट कॉल" तुम्हाला प्रचाराचे कॉल्स/एसएमएस प्राप्त करायचे किंवा नाही याचा पर्याय देतो.

"आंतरराष्ट्रीय व्यवहार" याचा अर्थ कार्डधारकाने त्याच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर वैध डेबिट कार्डद्वारा भारत, नेपाळ आणि भूतानच्या बाहेर केलेले व्यवहार असा होतो.

"इंटरनेट वेबसाइट" याचा अर्थ व्यापारी आस्थापनांच्या वेबसाइट्स असा होतो, जेथे या वेबसाइट्सद्वारे किंवा अन्यथा खरेदी केलेल्या वस्तू आणि सेवांसाठी कार्डधारकाला पैसे देण्यासाठी कार्ड स्वीकारले जाते आणि अन्य गोष्टींमध्ये स्टोअर्स, दुकाने, रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, युटिलिटी कंपन्या, रेल्वे आणि हवाई सेवा संस्थांच्या वेबसाइट्स चा समावेश असेल ज्या कार्ड स्वीकारत असल्याची जाहिरात करतात.

"व्यापारी आस्थापना" चा अर्थ अशा वास्तविक आणि/किंवा आभासी आस्थापना असा होतो, मग ते कुठेही असोत, जे कार्ड (व्हिसा/ मास्टरकार्ड/ रूपे किंवा अशा कोणत्याही कार्ड नेटवर्कद्वारे जारी केलेले) स्वीकारतात आणि त्यात इतरांसह, स्टोअर्स, दुकाने, रेस्टॉरंट, हॉटेल्स आणि एटीएम आणि मेल ऑर्डर जाहिरातदार यांच्यासह (किरकोळ विक्रेते, वितरक किंवा उत्पादक) एअरलाइन्स रोख आगाऊ पॉइंट्सचा समावेश असतो.

"व्यापारी" म्हणजे व्यापारी आस्थापनाची मालकी असलेली किंवा त्याचे व्यवस्थापन करणारी किंवा ते चालवणारी कोणतीही व्यक्ती असा होतो.

“वन-टाइम पासवर्ड (ओटीपी)” ही आपोआप निर्माण झालेली अंकीय किंवा अक्षरांकयुक्त  ओळ असते, जी वापरकर्त्याला एका व्यवहारासाठी किंवा सत्रासाठी प्रमाणीकृत करते.

"पिन" याचा अर्थ आरबीएल बँकेने कार्डधारकाला वाटप केलेला किंवा कार्डच्या संबंधात कार्डधारकाने निवडलेला एक गोपनीय वैयक्तिक ओळख क्रमांक असतो.

"पीओएस टर्मिनल" चा अर्थ व्यापारी आस्थापनेकडील पॉइंट ऑफ सेल (पीओएस) इलेक्ट्रॉनिक टर्मिनल असतो, जे भारतात किंवा परदेशात, कार्ड व्यवहारांवर प्रक्रिया करण्यास सक्षम असतात आणि जिथे, अन्य गोष्टींबरोबरच, कार्डधारक खरेदी करण्यासाठी त्याच्या कार्डशी लिंक केलेल्या खात्यातून पैसे मिळवण्यासाठी वापरू शकतो.

"प्राथमिक खाते" याचा अर्थ या कार्डला जोडलेले खाते असे होते.

"आरबीएल बँक" किंवा "बँक" म्हणजे आरबीएल बँक लिमिटेड असा होतो, जी भारतीय कंपनी कायदा, 1913 अंतर्गत समाविष्ट केलेली एक कंपनी असून, तिचे नोंदणीकृत कार्यालय शाहूपुरी, कोल्हापूर - 416 001 येथे आहे आणि तिचे कॉर्पोरेट कार्यालय वन इंडिया बुल्स केंद्र, टॉवर 2, 6वा मजला, 841 सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई 400 013 आणि तिचे एक कार्यालय 9वा मजला, टेक्नीप्लेक्स-1, वीर सावरकर फ्लायओव्हरच्या बाजूला, गोरेगाव (पश्चिम), मुंबई -400062 येथे आहे. आणि ती तिच्या शाखा, त्या कार्डचे मालक यांच्याद्वारा कार्य करते (जी अभिव्यक्ती त्याच्या विषयाशी किंवा संदर्भाशी विसंगत असेपर्यंत, त्यात त्याचे उत्तराधिकारी, प्रतिनिधी आणि अभिहस्तांकितींचा समावेश असेल).

"आरबीएल बँक ग्राहक सेवा केंद्र" याचा अर्थ आरबीएल बँकेने प्रदान केलेली आरबीएल बँक-फोन बँकिंग सेवा असा होतो, जी सर्व कार्डधारकांसाठी उपलब्ध असेल. आरबीएल बँक ग्राहक सेवा केंद्रचा लाभ घेणारे सर्व कार्डधारक आरबीएल बँकेने या संदर्भात विहित केलेल्या अटी व शर्तींना बांधील असतील. याच्या कॉल केंद्रसाठी **18001 026 222** वर संपर्क साधला जाऊ शकतो.

“आरबीएल बँकेची वेबसाईट” याचा अर्थ www.rblbank.com असून ती आरबीएल बँकेची वेबसाईट आहे.

“शेअर्ड नेटवर्क” याचा अर्थ रूपे/व्हिसा/मास्टरकार्ड किंवा इतर कोणतेही नेटवर्क असेल जे कार्ड्स स्वीकारतात.

'टॅरिफ ॲनेक्चर' याचा अर्थ कार्डवर देऊ केलेल्या सेवांसाठी लागू होणाऱ्या शुल्कांची तपशीलवार माहिती देणारे परिशिष्ट असा होतो. ही शुल्के आरबीएल बँकेच्या विवेकाधिकारात बदलू शकतात. सामान्यत: शुल्कामध्ये केले जाणारे असे कोणतेही बदल केवळ संभावित प्रभावाने कार्डधारकाला 1 महिन्याची पूर्वसूचना देऊन केले जाऊ शकतात.

“व्यवहार” याचा अर्थ एखादा व्यवहार करण्यासाठी कार्डधारकाद्वारा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कार्ड वापरून आरबीएल बँकेला दिलेल्या सूचना असा होतो.

“नॉन आरबीएल बँक एटीएम व्यवहार”: कार्डधारक/ग्राहकाद्वारा एखाद्या नॉन आरबीएल बँक एटीएमकडे केलेला कोणताही व्यवहार.

टोकन म्हणजे एक बदली क्रमांक आहे जो कार्डसोबत जोडलेला असतो. टोकन पैसे देण्यासाठी एक पर्यायी स्वरूपाचा घटक सक्षम करण्यासाठी वापरला जातो.

“टोकन सेवा” याचा अर्थ शेअर्ड नेटवर्क (रूपे/ व्हिसा/ मास्टरकार्ड) द्वारे पेमेंट खात्याच्या क्रेडेन्शियल्सचे टोकनीकरण सक्षम करण्याच्या, पैसे देण्यासाठी टोकनाइज्ड पेमेंट अकाउंट क्रेडेंशियलचा वापर, आणि टोकन लाइफ सायकल मॅनेजमेंट या उद्देशाने उपलब्ध केलेल्या सेवा असा होतो, कारण अशा सेवा नेटवर्क (रूपे/ व्हिसा/ मास्टरकार्ड) द्वारे वेळोवेळी पुरवल्या आणि अपडेट केल्या जातात.

**अन्वयार्थ:**

a) एकवचनातील सर्व संदर्भांमध्ये अनेकवचनी आणि त्याउलट यांच्या समावेश होतो आणि "समाविष्ट आहेत" या शब्दाचा अर्थ "मर्यादेशिवाय" असा समजला पाहिजे.
b) कोणत्याही लिंगाचा उल्लेख असलेल्या शब्दांमध्ये इतर लिंगाचा समावेश होतो.
c) कोणतीही संविधि, अध्यादेश किंवा इतर कायद्याच्या संदर्भामध्ये सध्याच्या काळात लागू असलेली सर्व नियमने आणि इतर साधने आणि सर्व एकत्रीकरण, दुरुस्त्या, पुनर्वर्तने किंवा बदलांचा समावेश आहे.
d) सर्व शीर्षके, ठळक टायपिंग आणि तिरपी अक्षरे (जर असल्यास) केवळ संदर्भाच्या सोयीसाठी लिहिली गेली आहेत आणि ती मर्यादा परिभाषित करत नाहीत किंवा अटींच्या अर्थावर किंवा अन्वयार्थावर परिणाम करत नाहीत.
e) व्हिसा/ मास्टरकार्ड/रूपे/एनपीसीआय नियमांचे संदर्भ व्हिसा/मास्टरकार्ड/रूपेद्वारा त्याच्या नेटवर्कच्या सर्व सदस्य बँकांना जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांशी संबंधित आहेत.
f) सामान्य कलम कायद्यात नमूद केल्यानुसार अन्वयार्थाचे नियम, त्याच्या विषयाशी किंवा संदर्भाशी विसंगत असल्याखेरीज, अटींना लागू होतील जसे की येथे अंतर्भूत केले आहे.

**अटींची उपयुक्तता:**

**अटी:**

या अटी आणि नियम कार्डधारक आणि आरबीएल बँक यांच्यातील करार बनवतात. कार्डधारकाने कार्ड अर्जावर स्वाक्षरी करून, किंवा कार्डची पावती लिखित स्वरूपात स्वीकारून, किंवा कार्डच्या मागील बाजू स्वाक्षरी करून, किंवा कार्डसह एक व्यवहार करून किंवा कार्डच्या पीओएस सक्रियतेची विनंती करून किंवा एटीएमद्वारे सक्रिय करून किंवा कार्ड त्याच्या नोंदीवर पत्त्यावर पाठवल्यापासून 10 दिवस उलटून गेल्यानंतर या अटी व शर्तींना बिनशर्त सहमती दिली आहे आणि स्वीकारले आहे असे मानले जाईल. या अटी व शर्ती कार्डधारकाच्या खात्याशी संबंधित अटी व शर्तींच्या व्यतिरिक्त असतील आणि त्यांच्यामुळे या अटी आणि शर्तींमध्ये कोणताही कमीपणा येणार नाही. कोणत्याही सेवा/सुविधा/ऑफर्सचा लाभ घेणारे कार्डधारक हे अशा सेवा/सुविधा/ऑफरसाठी RBL बँकेने वेळोवेळी दिलेल्या अटी व शर्तींना बांधील राहतील. ग्राहक अटी व शर्तींचे/त्याने बँकेसोबत केलेल्या इतर कोणत्याही करार किंवा वचनबद्धतेनुसार कराराचे/पालन करण्यात अयशस्वी झाल्यास/ग्राहकाचा मृत्यू झाल्यास/दिवाळखोरी/नादारी/ग्राहकाविरुद्ध इतर तशा प्रकारच्या कार्यवाही झाल्यास बँक कार्ड रद्द करेल.

**कार्ड जारी करणे:**

खातेधारकाकडून विनंती प्राप्त झाल्यानंतर त्याच्या आधारावर आरबीएल बँकेद्वारे खातेधारकाला कार्ड जारी केले जाईल. ही विनंती खाते उघडण्याच्या वेळी (खाते उघडण्याच्या फॉर्म द्वारे), खाते उघडल्यानंतर नंतरच्या टप्प्यात शाखेला दिलेल्या पत्राद्वारे मिळालेली असू शकते. ग्राहक अतिरिक्तपणे एसएमएस/ईमेल/इंटरनेट/मोबाइल बँकिंग आणि संपर्क केंद्र किंवा अशा कोणत्याही मार्गाद्वारे कार्डसाठी विनंती करू शकतो जो बँकेने ग्राहकांना विनंती स्वीकारण्याचा एक प्रमाणित मार्ग असल्याचे सांगितलेले असेल. ग्राहकाला त्याच्या खात्यावर कोणते कार्ड हवे आहे ते निवडणे आवश्यक आहे आणि कार्डशी संबंधित शुल्क भरणे आवश्यक आहे. हे कार्ड वैयक्तिक आणि गैर-वैयक्तिक ग्राहकांसाठी फक्त तेव्हाच जारी केले जाईल जेव्हा कार्यपद्धतिचे संयुक्तपणे आयोजन केलेले असत नाही. एनआरआय खात्याच्या आदेश धारकाच्या विनंतीवर बँक आपल्या विवेकबुद्धीनुसार त्याला डेबिट कार्ड जारी करू शकते. हे कार्ड देशांतर्गत वापरासाठी असेल आणि त्यासाठी बँकेच्या शुल्काच्या अनुसूचीनुसार आकारणी केली जाईल. आवश्यक फॉर्मसह जरुरी असणारी कागदपत्रे वेळोवेळी बदलू शकतात. आरबीएल बँकेच्या शाखांमधून त्यांना घेणे/जाणून घेणे आवश्यक आहे.

आरबीएल बँक ग्राहकांना त्यांचे डेबिट कार्ड वेगवेगळ्या प्रकारांमध्ये अपग्रेड करण्याचा पर्याय देखील देऊ शकते. अशा प्रकरणी, ग्राहकाचे सध्या असलेले डेबिट कार्ड नवीन कार्ड वापरल्यानंतर किंवा नवीन कार्ड जारी केल्याच्या 60 दिवसांच्या आत ब्लॉक केले जाईल. या अपग्रेड करण्यासाठी असलेली शुल्क वेळोवेळी आणि प्रकरणानुसार बदलू शकतात. ग्राहकाकडून अशी विनंती करण्यापूर्वी संबंधित किमतीची पूर्व-माहिती दिली जाईल.

**कार्डचे सक्रियण:**

ग्राहकाला पाठवलेले डेबिट कार्ड निष्क्रिय अवस्थेत असते. ग्राहकाला त्याचे/तिचे कार्ड सक्रिय करण्यासाठी कोणत्याही उपलब्ध मार्गाद्वारे, म्हणजेच मोबँक, इंटरनेट बँकिंग, एसएमएस, इ. पिन निर्माण करायचा असतो.

जारी करताना/पुन्हा जारी करताना कार्ड फक्त देशांतर्गत एटीएम आणि पीओएससाठी सक्षम केले जाईल. व्यवहाराच्या इतर सर्व पद्धती जसे की आंतरराष्ट्रीय, ऑनलाइन आणि संपर्करहित, ग्राहक बँकेने परवानगी दिल्याप्रमाणे मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, शाखा, आयव्हीआर इत्यादी मार्ग वापरून सक्षम करू शकतात. ग्राहक कोणत्याही वेळी या व्यवहारांचे मार्ग चालू/बंद करू शकतो किंवा या प्रत्येक व्यवहारासाठी व्यवहार मर्यादा निश्चित करू शकतो.

**कार्डचे फायदे:**

कार्डधारक आरबीएल बँकेच्या शाखेतील कोणत्याही एटीएममधून रोख रक्कम काढू शकतो/ॲक्सेस करू शकतो, व्यापारी आस्थापनांमध्ये (ऑनलाइन किंवा ऑफलाइन) पैसे भरणा करू शकतो, एटीएममध्ये कार्डच्या वापराद्वारे/ आरबीएल बँक ग्राहक सेवा किंवा आरबीएल बँकेने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही सेवांच्या वापरासह त्याच्या खात्यातील शिल्लकीच्या माहिती, मर्यादित व्यवहारांची संख्या असलेले मिनी स्टेटमेंट किंवा लहान विवरण पत्र तपासू शकतो. कार्डच्या वापराद्वारे अशा कोणत्याही सेवांचा लाभ घेणारे कार्डधारक आरबीएल बँकेने दिलेल्या, आणि अशा सेवांच्या संदर्भात वेळोवेळी केलेल्या दुरुस्त्यांनुसार अटी व शर्तींना बांधील असतील. संबंधित कार्ड देशांतर्गत व्यवहारांसाठी आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी एटीएम आणि व्यापारी आस्थापनांमध्ये वापरण्यासाठी वैध आहे. तथापि, भारत, नेपाळ आणि भूतानमधील व्यापारी आस्थापनांवरील कोणत्याही देशांतर्गत व्यवहारासाठी परकीय चलनात पैसे भरण्यासाठी कार्ड वैध नसेल. कार्ड त्या कार्डवर दर्शविलेल्या महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत वैध आहे. व्यवहार झाल्यानंतर, कार्डशी लिंक केलेले प्राथमिक खाते आरबीएल बँकेकडून त्वरित डेबिट केले जाईल.

**वैयक्तिक ओळख क्रमांक:**

कार्डच्या वापरण्यासाठी कार्डधारकाला सक्षम करण्यासाठी, ग्राहक कोणत्याही उपलब्ध मार्गाद्वारे स्वत:हून डेबिट कार्ड पिन बनवू शकतो. पिन जारी करताना आरबीएल बँक अत्याधिक सावधगिरी बाळगते आणि काळजी घेते, जेणेकरून कार्डधारक वगळता अन्य कोणालाही ते उघड केले जाणार नाही. पिन सेटिंग यंत्रणा सध्या मोबँक, नेट बँकिंग, आयव्हीआर आणि ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवरून एसएमएसद्वारे चालवली जात आहे. हा पिन नंतर कार्डधारक कोणत्याही आरबीएल बँकेच्या एटीएममधून, मोबँक, इंटरनेट बँकिंग, आयव्ही आरवरून किंवा त्याच्या नोंदणीकृत

मोबाईल नंबरवरून रिपिन संदेश पाठवून स्वतःच्या जोखमीवर बदलू शकतो. कार्डधारक कबूल करतो, प्रतिनिधित्व करतो आणि हमी देतो की पिनच्या वापरासह, कार्ड कार्यान्वित होईल आणि ते खाते पाहण्याची सुविधा देईल. कार्डधारक पिनचा वापर, गोपनीयता आणि संरक्षण तसेच असा पिन वापरून खात्यामध्ये प्रविष्ट केलेल्या सर्व ऑर्डर्स आणि माहितीतील बदलांची संपूर्ण जबाबदारी स्वीकारतो. कार्डधारकाने पिन कोणत्याही स्वरूपात नोंदवून ठेवू नये, जेणेकरुन पिन त्रयस्थ पक्षाला कळू शकेल. कार्डधारक आरबीएल बँकेला पिनद्वारे प्रमाणित केलेले व्यवहार आणि सुचना पार पाडण्यासाठी स्पष्ट अधिकार प्रदान करतो आणि ते मागे घेणार नाही. कार्डधारकाच्या पिनच्या पडताळणी व्यतिरिक्त, कार्डधारकाकडून पाठवलेल्या किंवा पाठवलेल्या व्यवहाराच्या सूचनांची सत्यता पडताळण्याचे आरबीएल बँकेचे कोणतेही बंधन नाही. कार्डधारकाने पिनची सुरक्षितता राखण्यासाठी सर्व योग्य पावले उचलावीत. येथे नमूद केलेल्या तरतुदींच्या अधीन राहून आणि आरबीएल बँकेने वेळोवेळी निर्दिष्ट केल्यानुसार, कार्डधारक कार्ड आणि/किंवा पिनच्या कोणत्यांनी अयोग्य/फसवणूक/अनधिकृत/नकली/चुकीच्या वापरासाठी आरबीएल बँकेला जबाबदार धरणार नाही. कार्ड कोणत्याही त्रयस्थ पक्षाच्या हातात पडल्यामुळे किंवा पिन कोणत्याही त्रयस्थ पक्षाला समजल्यामुळे कोणत्याही त्रयस्थ पक्षाद्वारे कार्डच्या वापर/दुरुपयोगाशी संबंधित कोणत्याही परिणामांसाठी आरबीएल बँक जबाबदार राहणार नाही. कोणत्याही त्रयस्थ पक्षांना खात्यासह सेवा प्राप्त करण्यास मिळाल्यास, त्यासाठी कार्डधारक जबाबदार असेल आणि अशा एक्सेस आणि वापराच्या किंवा अन्यथा आधारावर किंवा संबंधित तृतीय पक्षाद्वारे अशा गैरवापर/वापरामुळे उद्भवलेल्या कोणत्याही दायित्व, खर्च किंवा नुकसानीविरूद्ध आरबीएल बँकेची भरपाई करेल.

**कार्डची वैधता:**

कार्डच्या दर्शनी भागावर सूचित केलेल्या महिन्याच्या/वर्षाच्या शेवटच्या तारखेपर्यंत कार्ड मान्य असेल. कार्डधारक कार्डची मुदतसमाप्ती त्याचे अनेक तुकडे करून ते नष्ट करेल. कार्डची मुदत संपल्यावर नूतनीकरण करण्याचा एकमेव अधिकार आरबीएल बँकेकडे असेल.

**गहाळ झालेले किंवा चोरीस गेलेले कार्ड:**

कार्डधारकाने त्याचे कार्ड हरवले किंवा चोरीला गेल्यास स्थानिक पोलिसांकडे तक्रार नोंदवली पाहिजे आणि त्याची एक प्रत आरबीएल बँकेला पाठवली पाहिजे. कार्डधारक दूरध्वनीवरून आरबीएल बँकेच्या ग्राहक सेवा केंद्रांना किंवा आरबीएल बँकेच्या त्याच्या शाखेत लिखित पत्रव्यवहाराद्वारा किंवा आरबीएल बँकेला स्वीकार्य अशा इतर पद्धतींद्वारे कार्ड हरवल्याची तक्रार करू शकतो. अधिक जाणून घेण्यासाठी, कृपया यूआरएलवर क्लिक करा: http://bitly.ws/suwH. आरबीएल बँकेच्या वेबसाइटवर ग्राहक सेवेचा संपर्क तपशील दिलेला आहे. आरबीएल बँक पुरेशा पडताळणीनंतर आरबीएल बँकेच्या कामकाजाच्या दिवसात कार्ड हॉटलिस्ट/ब्लॉक करेल. कार्डधारकाचे कार्ड परदेशात हरवल्यास, तो

एकतर वरील प्रक्रिया करू शकतो किंवा व्हिसा/मास्टरकार्ड ग्लोबल इमर्जन्सी असिस्टन्स हेल्प लाइनद्वारे हरवल्याची तक्रार करू शकतो; अशा सेवांच्या वापरासाठी लागणारे शुल्क कार्डधारकाला द्यावे लागेल. कार्डच्या सुरक्षिततेसाठी कार्डधारक जबाबदार असेल आणि त्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सर्व पावले उचलेल. कार्ड हॉट लिस्ट/रद्द होईपर्यंत कार्डावर लागणाऱ्या सर्व शुल्कांसाठी कार्डधारक जबाबदार असेल. पुढे, वर उल्लेख केलेल्या पायऱ्यांचे पालन न केल्याचे आरबीएल बँकेला आढळून आल्यास, हरवलेल्या किंवा चोरीला गेलेल्या कार्डवरील आर्थिक दायित्व कार्डधारकावर राहील. एकदा कार्ड हरवल्याची, चोरीला गेल्याची किंवा खराब झाले आणि नंतर ते सापडले की, ते तात्काळ अर्धे कापून, आरबीएल बँकेकडे परत करण्याची आणि त्याचा गैरवापर टाळण्यासाठी पुरेशी काळजी घेतली जाईल याची कार्डधारकाने दखल घेतली पाहिजे.

**कार्ड वापस करणे/बदली कार्ड घेणे:**

कार्डधारकाला जारी केलेले कार्ड आरबीएल बँकेची मालमत्ता राहील आणि विनंतीवर, ते आरबीएल बँकेला परत केले जाईल. कार्डधारकाला यापुढे सेवांची आवश्यकता नसल्यास किंवा कोणत्याही कारणामुळे आरबीएल बँकेने सेवा मागे घेतल्यास कार्डधारक कार्ड रद्द करण्यासाठी आरबीएल बँकेकडे परत करेल. आरबीएल बँक, आपल्या पूर्ण विवेकाधिकारात, कार्ड हरवल्यास/चोरीस गेलेले असल्याच्या कारणासह कार्डधारकांना नवीन पिनसह बदली कार्ड जारी करू शकते.

**बंद करणे:**

कार्डधारक त्याचे कार्ड तिरप्या रेषेत कापून परत करत आरबीएल बँकेला लिखित सूचना देत कार्ड कधीही थांबवू/बंद करू शकतो. आरबीएल बँकेद्वारा लिखित सूचनेची पावती मिळेपर्यंत, त्यासाठी होणाऱ्या शुल्कांसाठी कार्डधारक जबाबदार असेल. आरबीएल बँक कोणत्याही वेळी, सुचनेसह/सुचनेशिवाय आरबीएल बँकेच्या विवेकाधिकारात आवश्यक असलेल्या परिस्थितीनुसार कार्ड बंद करू शकते.

**मार्गदर्शक सूचनांचा वापर:**

1. कार्डधारकाने नेहमी कार्ड सुरक्षित ठिकाणी ठेवल्याची आणि कोणत्याही परिस्थितीत कार्ड अन्य कोणत्याही व्यक्तीला वापरण्याची परवानगी न देण्याची खात्री केली पाहिजे. कार्डधारक कार्ड मिळाल्यावर लगेचच त्यावर स्वाक्षरी करेल. कार्डधारकाने पहिल्या वापरानंतर पिन (आरबीएल बँकेने दिलेला असल्यास) बदलणे आवश्यक आहे आणि कार्डच्या सुरक्षित वापरासाठी सुरक्षितता उपाय म्हणून दुसरा पिन निवडणे आवश्यक आहे. आरबीएल बँकेने दिलेल्या सर्व सुविधांसाठी आणि सर्व संबंधित शुल्कांसाठी कार्डधारक जबाबदार असेल आणि कार्ड आणि आरबीएल बँकेसोबतच्या सर्व व्यवहारांच्या संबंधात सद्भावनेने वागेल. आरबीएल बँक कार्डधारकास नोटीस देत

कार्डद्वारे समर्थित व्यवहारांचे प्रकार बदलण्याचा अधिकार राखून ठेवते. कार्डधारकाने आरबीएल बँकेद्वारे खाते/कार्ड राखण्यात कोणतीही त्रुटी किंवा अनियमितता आढळल्यास कोणत्याही आरबीएल बँकेच्या कस्टमर सर्विस सेन्टर्सवर आरबीएल बँकेला ताबडतोब सूचित करावे.

2. कार्डधारक डू नॉट कॉल सेवा सक्रिय करून प्रचारात्मक प्रस्तावांचे संदेश न कळविण्याचा पर्याय स्वीकारू शकतो.
3. डेबिट कार्डचा वापर संबंधित नियामक प्राधिकरणांनी वेळोवेळी अद्यतनित केल्यानुसार परदेशी ऑनलाइन विदेशी चलनाच्या ट्रेडिंगसह कोणत्याही किंवा सर्व प्रतिबंधित व्यवहारांसाठी केला जाणार नाही. या गोष्टीसाठी सध्या असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याची जबाबदारी डेबिट कार्डधारकाची असेल.

**अनधिकृत व्यवहारांच्या संदर्भात दायित्त्व**

कार्ड हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास किंवा त्या कार्डवर कोणताही अनधिकृत व्यवहार झाल्याच्या प्रसंगी, कार्ड सदस्याने त्वरित आरबीएल बँकेला कार्ड गहाळ झाल्याची/चोरीची तक्रार करणे आवश्यक आहे. कार्डधारकाने आरबीएल बँकेच्या 24 तास कस्टमर सर्विस केंद्रावर कॉल करून किंवा आरबीएल बँकेच्या त्याच्या शाखेत लिखित पत्रव्यवहाराद्वारे किंवा आरबीएल बँकेला स्वीकार्य अशा अन्य पद्धतींद्वारे कार्ड गहाळ झाल्याची/चोरीची सूचना तात्काळ दिली पाहिजे. कार्डधारकाने त्याने आरबीएल बँकेला तत्काळ लिखित स्वरूपात सूचित केले असेल, तर एखाद्या अनधिकृत व्यवहारासाठी (एटीएममधून रोख पैसे काढणे आणि डेबिट कार्डचा ऑनलाइन वापर वगळता) या कलमाच्या तरतुदींच्या मर्यादेपर्यंत आणि त्यांच्या अनुषंगाने, कार्डधारक कोणतेही आर्थिक दायित्व सहन करणार नाही आणि आरबीएल बँकेच्या मते, कार्डधारक अनधिकृत व्यवहार आणि निष्काळजीपणा, फसवणूक किंवा संगनमतासाठी दोषी नसेल. हा लाभ कार्डधारकास येथे समाविष्ट असलेल्या अटींच्या अधीन राहिल्यास आणि केवळ खालील अटी पूर्ण झाल्यास उपलब्ध असेल:

1. कार्डधारकाने आरबीएल बँकेने विहित केलेल्या कार्यप्रणालीनुसार गहाळ झालेल्या/चोरीस गेलेल्या कार्डची उचितपणे माहिती दिल्यावर आणि कार्डधारकाने अशा कार्ड गहाळ झाल्याचे/चोरीस गेल्याचे कळविलेल्या एफआयआरची प्रत आरबीआय बँकेला सादर केल्यावर; अशा रीतीने कार्ड गहाळ झाल्याचे/चोरीस गेल्याचे आरबीआय बँकेला कळविण्याच्या 15 दिवसांच्या कालावधीत उक्त अनधिकृत व्यवहार झाल्यास;
2. कार्डधारकाने कार्ड गहाळ झाल्याची/चोरी झाल्याची माहिती देण्याच्या तारखेपूर्वी 3 महिन्यांच्या आत कार्ड वापरून किमान एक खरेदीचा व्यवहार केला असल्यास, आणि
3. कार्डधारकाने मोबाईल बँकिंग आणि व्यवहार एसएमएस व्यवहारासाठी आरबीएल बँकेसह त्याच्या मोबाईल नंबरची नोंदणी केलेली असल्यास.

तथापि, आरबीएल बँक आपल्या विवेकाधिकारात कार्डधारकाला विमा संरक्षणाचा पूर्णपणे उक्त लाभ नाकारू शकते किंवा अशा चौकशी/तपासणीवर झालेला अतिरिक्त खर्च लागू करू शकते.

1. जर आरबीएल बँक, केवळ तिच्या मते, उपलब्ध पुराव्याच्या आधारावर (कार्डधारकाने दिलेल्या आणि/किंवा अन्यथा प्राप्त केलेल्या) असे ठरवते की कार्डधारक खाते किंवा कार्ड (ज्यात कार्ड, किंवा खाते किंवा पिनच्या संरक्षण, आणि तोटा किंवा अनधिकृत व्यवहार कळवणे सामील असेल) हाताळण्यात अतिशय निष्काळजी किंवा फसवणूक करणारा होता, आणि/ किंवा
2. जर आरबीएल बँक, केवळ तिच्या मते, अनधिकृत व्यवहार आणि/किंवा व्यापारी प्रकारांसह आणखी तपासण्यांची आवश्यकता आहे असे ठरवल्यास; आणि/किंवा
3. जर कार्डधारकाच्या खात्याचा अगोदरच इतिहास असंतोषजनक असल्यास.

कार्ड्सवरील विम्याचे संरक्षण केवळ कोणत्याही गैरवापर/अनधिकृत व्यवहारासाठी संरक्षण प्रदान करते. फसवणूकीचा व्यवहार सिद्ध झाल्यास, संरक्षणाची मर्यादा कार्डच्या प्रकारासाठी उपलब्ध असलेल्या विम्याच्या मर्यादेच्या मर्यादेपर्यंत असेल आणि ती त्रयस्थ पक्ष विमा कंपनीद्वारे दिली जाईल.

**ग्राहकाचे मर्यादित दायित्त्व:**

(a) ग्राहकाचे शून्य दायित्त्व

1. खालील प्रसंगांमध्ये जिथे अनधिकृत व्यवहार होतो, तिथे ग्राहकाचा शून्य दायित्वाचा हक्क निर्माण होईल:
   i. बँकेच्या वतीने सहाय्यकारी फसवणूक/निष्काळजीपणा/उणीव (ग्राहकाने व्यवहाराची तक्रार केली असो की नसो)
   ii. त्रयस्थ पक्षाद्वारे उल्लंघन, ज्यात उणीव बँकेकडून किंवा ग्राहकाकडून नसते, परंतु प्रणालीमध्ये कुठेही असते, आणि अनधिकृत व्यवहाराच्या संदर्भात बँकेकडून पत्रव्यवहार मिळाल्याच्या तीन दिवसांच्या आत ग्राहक बँकेला सूचित करतो.

(b) ग्राहकाचे मर्यादित दायित्त्व

2. खालील प्रकरणांमध्ये अनधिकृत व्यवहारांसाठी होणाऱ्या नुकसानासाठी ग्राहक जबाबदार असेल:
   i. अशा प्रकरणांमध्ये जेथे ग्राहकाच्या निष्काळजीपणामुळे नुकसान झाले आहे, जसे की त्याने पैसे भरण्याचे अधिकार कोणाला दिले आहेत, याबाबत ग्राहकाने बँकेला अनधिकृत व्यवहाराची तक्रार करेपर्यंत संपूर्ण तोटा सहन करावा लागेल. अनधिकृत व्यवहार कळवल्यानंतर होणारे कोणतेही नुकसान बँक भरून देईल.
   ii. अशा प्रकरणांमध्ये जेथे अनधिकृत इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहाराची जबाबदारी बँकेची किंवा ग्राहकाची नसते, परंतु यंत्रणेमध्ये अन्यत्र असते आणि जेव्हा व्यवहाराबद्दल बँकेला सूचित करण्यात ग्राहकाकडून विलंब (बँकेकडून पत्रव्यवहार प्राप्त झाल्यानंतर चार ते सात कामकाजी दिवसांचा) होतो, तेव्हा ग्राहकाचे प्रति व्यवहार दायित्व व्यवहार मूल्य किंवा कोष्टक 1 मध्ये नमूद केलेल्या रकमेपर्यंत, जे कमी असेल, त्यानुसार मर्यादित असेल.

| कोष्टक 1 | |
|---|---|
| परिच्छेद 7 (ii)च्या अंतर्गत ग्राहकाचे कमाल दायित्त्व | |
| खात्याचा प्रकार | कमाल दायित्त्व (₹) |
| • बीएसबीडी खाती | 5,000 |
| • इतर सर्व एसबी खाती<br>• प्री-पेड पेमेंट इंस्ट्रूमेंट्स, आणि गिफ्ट कार्ड्स<br>• एमएसएमईची चालू/कॅश क्रेडिट/ओव्हरड्राफ्ट खाती<br>• वार्षिक सरासरी शिल्लक असलेल्या व्यक्तींची चालू खाती/ कॅश क्रेडिट/ ओव्हरड्राफ्ट खाती (फसवणुकीच्या घटनेच्या अगोदर 365 दिवसांदरम्यान/ 25 लाख रुपयांपर्यंत मर्यादा<br>• 5 लाख रुपयांपर्यंतच्या मर्यादेसह क्रेडिट कार्ड्स | 10,000 |
| • इतर सर्व चालू/कॅश क्रेडीट/ओव्हर ड्राफ्ट खाती<br>• 5 लाख रुपयांपेक्षा जास्त मर्यादेसः क्रेडिट कार्ड्स | 25,000 |

पुढे, कळवण्यातील विलंब सात कामकाजी दिवसांपेक्षा जास्त असेल, तर ग्राहकाचे दायित्त्व बँकेच्या मंडळाद्वारा मंजूर धोरणानुसार निश्चित केले जाईल.

8. जेथे उणीव बँकेकडून किंवा ग्राहकाकडून नसते, परंतु प्रणालीमध्ये कुठेही असते, अशा वेळी वर दिलेल्या परिच्छेद 6 (ii) आणि परिच्छेद 7 (ii) मध्ये दिल्यानुसार, त्रयस्थ पक्षाद्वारे झालेल्या उल्लंघनात ग्राहकाच्या एकंदर दायित्त्वाचा सारांश कोष्टक 2 मध्ये दिला आहे:

| कोष्टक 2 | |
|---|---|
| ग्राहकाच्या दायित्त्वाचा सारांश | |
| पत्रव्यवहार मिळाल्याच्या तारखेपासून फसवणुकीचा व्यवहार कळवण्यासाठी लागलेला वेळ | ग्राहकाचे दायित्त्व (₹) |
| 3 कामकाजी दिवसांच्या आत | शून्य दायित्त्व |
| 4 ते 7 कामकाजी दिवसांच्या आत | व्यवहाराचे मूल्य किंवा कोष्टक 1 मध्ये नमूद केलेले मूल्य, जे कमी असेल |
| 7 कामकाजी दिवसांपेक्षा अधिक | बँकेच्या मंडळाद्वारे मंजूर धोरणाच्या अनुसार |

तक्ता 2 मध्ये नमूद केलेल्या कामकाजाच्या दिवसांची, पत्रव्यवहार मिळाल्याच्या तारखेस वगळून, संख्या ग्राहकाच्या गृह शाखेच्या कामकाजाच्या वेळापत्रकानुसार मोजली जाईल. अधिक माहितीसाठी, कृपया या यूआरएलवर क्लिक करा: http://bitly.ws/svVU

**प्रचारात्मक प्रस्ताव:**

आरबीएल बँक तिच्या वेबसाइटवर तिच्या ग्राहकांसाठी त्रयस्थ पक्षांद्वारे प्रस्तुत केलेल्या ऑफर/उत्पादने/सेवांना प्रदर्शित करते आणि ती यापैकी कोणतेही ऑफर्स/उत्पादने/सेवा देऊ करत नाही. आरबीएल बँक ग्राहकांसमोर उक्त त्रयस्थ पक्षाचे सव्यक्त किंवा निहित एजंट म्हणून काम करत नाही. आरबीएल बँक त्रयस्थ  पक्षांद्वारे दिल्या जाणाऱ्या ऑफर्स/उत्पादने/सेवांच्या संदर्भात हमी देत नाही किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. आरबीएल बँक या ऑफर/उत्पादने/सेवांसाठी कोणत्याही कंपनी/त्रयस्थ पक्ष, तिचे एजंट किंवा प्रतिनिधींद्वारा दिल्या जाणाऱ्या सेवा/विक्री/गुणवत्ता/वैशिष्ट्यांमधील कोणत्याही उणीवासाठी किंवा अपुरेपणासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही. ग्राहक यद्वारे कबूल करतो की, ऑफरमुळे त्याला/तिला होणाऱ्या कोणत्याही कृती, दावे, मागण्या, नुकसान, हानी, खर्च आणि शुल्कांसाठी आरबीएल बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही. त्रयस्थ पक्षाची वेबसाइट अयशस्वी झाल्यास किंवा त्यात व्यत्यय आल्यास किंवा त्रयस्थ पक्षाच्या वेबसाइटवर प्रवेश करणे, प्रवेश करण्याच्या, प्रवेशातील असमर्थता किंवा पक्षाच्या वेबसाइटच्या वापराशी संबंधित इतर कोणत्याही कारणामुळे तुम्हाला होणारे नुकसान, हानी किंवा खर्च इत्यादीसाठी आरबीएल बँक जबाबदार असणार नाही. कोणतेही प्रश्न, तक्रारी, समस्या आणि/किंवा अभिप्राय थेट त्रयस्थ पक्षांद्वारेच हाताळले जातील. ऑफर्स/उत्पादने/सेवा इतर प्लॅटफॉर्मवर देखील उपलब्ध असू शकतात. अशा ऑफर्स/उत्पादने/सेवा मिळवण्यातील ग्राहकाचा सहभाग पूर्णपणे ऐच्छिक असेल.

**अनेक खाती:**

कार्डधारक कबूल करतो की त्याची आरबीएल बँकेत एकाहून जास्त खाती असल्यास, आरबीएल बँक कार्डची सुविधा असलेल्या खात्यांची संख्या ठरवेल. अनेक खात्यांशी लिंक केलेल्या कार्ड्सच्या प्रकरणात, शेअर्ड नेटवर्क एटीएम्सवर केलेले सर्व व्यवहार आणि कार्डसह केलेले पीओएस टर्मिनल व्यवहार यांचा केवळ प्राथमिक खात्यावर परिणाम होईल. आरबीएल बँकेच्या एटीएमच्या बाबतीत, ग्राहकाला ज्यामधून पैसे वजा करायचे आहेत ते खाते निवडण्याचा पर्याय असेल. आरबीएल बँक सर्व वस्तू किंवा सेवांच्या खरेदीचे मूल्य, रोख, शुल्क आणि कार्डच्या वापरामुळे देय असलेल्या रकमेसाठी कार्डशी जोडलेल्या खात्यातून रक्कम वजा करेल. सर्व व्यवहार कार्डशी जोडलेले खाते(खात्यांच्या) विवरण पत्रामध्ये दिसून येतील.

**विवरणपत्रे आणि नोंदी:**

कार्डधारक आरबीएल बँकेच्या कस्टमर सर्विस केंद्राला कॉल करून त्याच्या व्यवहारांचा मौखिक किंवा लेखी इतिहास मिळवू शकतो. तसेच, कार्डधारक आरबीएल बँकेच्या इंटरनेट बँकिंगवर ऑनलाइन उपलब्ध असलेल्या खात्याच्या विवरण पत्रातून आणि आरबीएल बँकेच्या एटीएमवर शेवटचे 10 व्यवहार पाहू शकतो. कार्डधारकाला त्याला उपलब्ध करून देण्यात आलेल्या कोणत्याही खात्याच्या विवरण पत्रावर खात्याच्या व्यवहारांमध्ये/तपशिलामध्ये काही अनियमितता किंवा विसंगती आढळल्यास, तो आरबीएल बँकेला 15 दिवसांच्या आत लिखित स्वरुपात कळवेल. जर आरबीएल बँकेला 15 दिवसांच्या आत विपरीत अशी कोणतीही माहिती मिळाली नाही, तर आरबीएल बँक खात्याचे विवरण पत्र आणि व्यवहार बरोबर असल्याचे गृहीत धरू शकते. कार्डधारकाचे हित सुनिश्चित करण्यासाठी, आरबीएल बँक आपल्या विवेकाधिकारात एटीएम व्यवहारासाठी कार्ड सुविधेचा लाभ घेत असताना कोणत्याही व्यक्तीचा प्रवेश आणि उपस्थिती यांना कॅमेरा किंवा व्हिडीओ टेपवर रेकॉर्ड करू शकते. आरबीएल बँकेने राखलेल्या सर्व नोंदी, या अटींच्या अनुषंगाने कार्डधारकाच्या सूचनांचे इलेक्ट्रॉनिक किंवा डॉक्युमेंटरी स्वरूपात आणि असे इतर तपशील (ज्यात दिलेले किंवा प्राप्त झालेल्या पेमेंट्स सामील असतील, परंतु इतकेच मर्यादित नसेल) आणि वर नमूद केल्याप्रमाणे कार्डधारकाच्या विरुद्ध केलेले सर्व कॅमेरा/व्हिडिओ रेकॉर्डिंग, अशा सूचना आणि अशा इतर तपशीलांचा निर्णायक पुरावा मानले जातील.

**एटीएमचा वापर:**

हे कार्ड गोपनीय पिनच्या मदतीने एटीएमच्या ठिकाणी वापरले जाऊ शकते. पिनच्या वापरासह केलेले सर्व व्यवहार ही कार्डधारकाची जबाबदारी असेल. कार्डधारक स्वीकारतो की, खात्या(खात्यां)मध्ये कितीही रक्कम शिल्लक असली, तरीही आरबीएल बँकेने निश्चित केल्यानुसार प्रति व्यवहार प्रतिदिन ठराविक रोख रक्कम काढण्याची त्याला परवानगी दिली जाईल. ही रक्कम आरबीएल बँकेच्या वेबसाइटवर वेळोवेळी जाहीर केली जाईल. या मर्यादेचे उल्लंघन करण्याचा कोणताही प्रयत्न केल्यास त्याच्या कार्डची सुविधा मागे घेतली जाऊ शकते. जेव्हा कार्डधारकाने एखाद्या एटीएमद्वारे व्यवहार पूर्ण केल्यावर, तो व्यवहाराची छापील नोंद म्हणजेच व्यवहाराची स्लिप/एटीएम पावती मिळवण्याचा पर्याय निवडू शकतो. जेव्हा कार्डधारक त्याचे कार्ड वापरतो तेव्हा उपलब्ध रक्कम या एटीएम पावतीवर दाखवली जाते. कार्डधारकाने एटीएमद्वारे निर्माण झालेल्या व्यवहारांच्या नोंदी त्याच्याकडे ठेवण्याचा सल्ला दिला जातो. कार्डधारक त्याच्या खात्यात पुरेसा पैसा उपलब्ध असल्याशिवाय कार्ड वापरून पैसे काढण्याचा प्रयत्न करणार नाही असे मान्य करतो. खात्यात पुरेशी रक्कम ठेवण्याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी पूर्णपणे कार्डधारकावर असेल.

आरबीएल बँकेचे एटीएम नसलेल्या एटीएममध्ये दर महिन्यास जास्तीत जास्त 50 व्यवहारांना परवानगी दिली जाऊ शकते, ज्यानंतर कार्ड आरबीएल बँक नसलेल्या एटीएम व्यवहारांसाठी ब्लॉक केले जाईल आणि हा मर्यादित व्यवहारांचा वापर पुढील महिन्यात पुनरुज्जीवित होईल. ग्राहक आरबीएल बँकेच्या एटीएममध्ये आणि ऑनलाइन, पीओएस आणि कॉन्टॅक्टलेस व्यवहारांसाठी कार्ड वापरणे सुरू ठेवू शकतात. ग्राहक मदतीसाठी जवळच्या शाखेला भेट देऊ शकतात किंवा 022 6232 7777 वर कॉल करू शकतात.

आरबीएल बँक त्याच्या अंतर्गत धोरणांच्या आधारावर वेळोवेळी आणि वेळोवेळी जारी केल्या गेलेय नियामक मार्गदर्शक सूचनांच्या अनुसार  आरबीएल बँकेचे एटीएम नसलेल्या एटीएममध्ये करू शकत असलेल्या व्यवहारांची संख्या बदलण्याचा हक्क राखते.

या अटी व शर्तीमध्ये इतर काहीही असले तरी, कोणतीही संशयास्पद किंवा फसवणुकीचे कार्य आढळल्यास, आरबीएल बँक स्वतःच्या विवेकाधिकारानुसार अशा ग्राहक/कार्डधारकांचे व्यवहार आणि कार्डचा वापर निलंबित किंवा ब्लॉक करेल.

**व्यापारी स्थानाचा वापर:**

कार्ड, जे व्हिसा/मास्टरकार्ड आणि/किंवा आरबीएल बँकेने मान्यता दिलेले आहे आणि पीओएस टर्मिनल असलेल्या अशा इतर एजन्सीचे लोगो यावर प्रदर्शित केले आहे, ते  भारतातील सर्व व्यापारी आस्थापनांमध्ये देशांतर्गत व्यवहारांसाठी आणि परदेशात आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी (आंतरराष्ट्रीय कार्डच्या बाबतीत) स्वीकार्य आहे. पीओएस टर्मिनलवरून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने छापल्या जाणाऱ्या चार्ज स्लिप/विक्री स्लिपच्या बाबतीत हे कार्ड केवळ इलेक्ट्रॉनिक वापरासाठी आहे. जेव्हा पण व्यापारी आस्थापनेत कार्ड वापरले जाते, तेव्हा कार्डधारकाने विक्री स्लिपवर (पिनवर आधारित व्यवहार नसल्यास) स्वाक्षरी करणे आवश्यक आहे आणि त्याची प्रत आपल्याकडे ठेवली पाहिजे. बँक अतिरिक्त शुल्क आकारून विक्री स्लिपच्या प्रती देऊ शकते. कार्डधारकाने स्वतःहून स्वाक्षरी केली नसलेली कोणतीही विक्री स्लिप असेल, परंतु ती कार्डधारकाद्वारे अधिकृत असल्याचे सिद्ध करता येत असल्यास, हे त्याचे दायित्व असेल. हे कार्ड पीओएस टर्मिनलच्या कार्यक्षमतेच्या अनुसर व्यापारी स्थानांवर स्थापित केलेल्या पीओएस टर्मिनल्सवर कार्डधारकाच्या स्वाक्षरीच्या किंवा पिनच्या मदतीने वापरता येईल. बँक कार्डधारकाच्या व्यापाऱ्यांसोबतच्या कोणत्याही व्यवहाराची जबाबदारी स्वीकारणार नाही, ज्यामध्ये वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याबरोबरच अन्य बाबींचा देखील समावेश असेल. कार्डधारकाच्या कोणत्याही व्यापारी आस्थापनेबाबत काही तक्रारी असल्यास, व्यापारी आस्थापनेसह त्या कार्डधारकाने या प्रकरणाचे निराकरण केले पाहिजे आणि तसे न करू शकल्यास, त्याला आरबीएल बँकेच्या कोणत्याही दायित्त्वांना स्वीकारावे लागेल. तथापि, कार्डधारकाने या तक्रारीची आरबीएल बँकेला त्वरित सूचना द्यावी. आरबीएल बँक कोणत्याही व्यापारी आस्थापनेने आकारलेल्या

आणि व्यवहाराच्या रकमेसह कार्डशी जोडलेल्या खात्यातून वजा केलेल्या कोणत्याही अधिभाराची जबाबदारी स्वीकारत नाही. पैसे भरणा करण्यासाठी आरबीएल बँकेकडून व्यापारी आस्थापनेकडून प्राप्त झालेले कोणतेही शुल्क किंवा इतर पैसे भरणा करण्याची मागणी हा निर्णायक पुरावा असेल की अशा मागणीवर नोंदवलेले शुल्क व्यापारी आस्थापनेवर त्या रकमेसाठी आणि कार्डधारकाने त्या शुल्कामध्ये संदर्भित कार्ड वापरून योग्यरित्या वसूल केले होते, त्याला अपवाद म्हणजे कार्ड हरवलेले असेल, चोरीला गेलेले असेल किंवा फसवणूक करून गैरवापर केलेले असेल तर त्यासाठी कार्डधारकाला पुरावा द्यावा लागेल. एखाद्या कार्डधारकाला एखाद्या त्रुटीमुळे किंवा व्यापारी मालाच्या परताव्याच्या कारणामुळे पूर्ण झालेला व्यवहार रद्द करायचा असेल, तर व्यापाऱ्याने पहिली विक्री स्लिप रद्द केली पाहिजे आणि कार्डधारकाने रद्द केलेल्या विक्री स्लिपची एक प्रत आपल्याकडे ठेवली पाहिजे. अशा व्यवहारांमुळे डेबिटचे रिव्हर्सल/परतावा झाल्यास, आवश्यकता असल्यास, चार्ज स्लिप/विक्री स्लिप कार्डधारकाने तयार करणे आवश्यक आहे.

**आंतरराष्ट्रीय वापर:**

a) हे कार्ड नेपाल आणि भूतानमध्ये विदेशी चलनाच्या व्यवहारांसाठी वैध नाही. म्हणजेच, स्थानिक चलन किंवा भारतीय रुपयाच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही चलनासाठी नाही.
b) भारताबाहेर स्थित व्यापाऱ्यांकडे सुरु केलेले व्यवहार त्या देशांमध्ये पालन केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक तत्वांच्या आदारे पिन/ अतिरिक्त प्रमाणीकरण शिवाय प्रक्रिया केले जाऊ शकतात.
c) आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी, कार्डधारकाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या विनिमय नियंत्रण नियमनांनुसार कार्डचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचे अनुपालन करण्यात अयशस्वी झाल्यास, कार्डधारक परकीय चलन व्यवस्थापन कायदा 1999 अंतर्गत कारवाई होऊ शकते आणि बँकेच्या किंवा आरबीआयच्या सांगण्यावरून त्याला बँकेकडून कार्ड धारण करण्यापासून प्रतिबंधित केले जाऊ शकते. आरबीआयच्या विनिमय नियंत्रण नियमनांचे पालन न केल्यामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही/सर्व परिणामांपासून आणि विरुद्ध कार्डधारक बँकेला नुकसानभरपाई देईल आणि बँकेला निर्दोष मानेल.
d) कार्डधारकाने रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी विहित केलेल्या परकीय चलनाचे हक्क ओलांडल्यामुळे शुल्कासाठी नकार दिल्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे झालेल्या नुकसानी किंवा नुकसानीच्या संदर्भात बँकेला भरपाई केली जाईल आणि त्याबाबत बँकेचे कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही.
